महाराष्ट्र शासन
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, (विकास शाखा),**
**दालन क्रमांक ११२, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४**
दूरध्वनी क्र.व फॅक्स- ०२२-२७५७१३६९ Email- estkonkanlekha@gmail.com

क्र.विशा/कार्या-४/लेखा-२/यपंराअ/२०२३-२४/ ९० /२०२५ दिनांक : १८.०३.२०२५

## दरपत्रक सूचना

**विषय :** यशवंत पंचायत राज अभियान सन २०२३-२४ च्या कार्यक्रमासाठी दरपत्रके सादर करणेबाबत.

**संदर्भ :** १. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६.

२. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचे पत्र क्र. झेडपीए-२०२३/ प्र.क्र. १२२/पंरा-१ दि. १६.२.२०२४

३. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए-२०२४/ प्र.क्र. ६५/पंरा-१ दि. १७/०३/२०२५.

४. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग पत्र क्र. झेडपीए-२०२३/ प्र.क्र. १२२/पंरा-१ दि. १८/०३/२०२५

ग्राम विकास व पंचायती राज विभागातील मंत्रालय स्तरावरील गुणवंत अधिकारी/कर्मचारी, तसेच क्षेत्रीय स्तरावरील गुणवंत अधिकारी/कर्मचारी/ग्रामसेवक यांना व राज्यातील अतिउत्कृष्ट काम केलेल्या पंचायत राज संस्थांना पारितोषिक वितरण समारंभ दिनांक २५ ते २८ मार्च २०२५ या पैकी कोणत्याही दिवशी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई किंवा मा. मंत्री महोदय (ग्रामविकास व पंचायत राज) यांचेकडून स्थळ निश्चित होईल, त्याप्रमाणे आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

सदरच्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असणा-या वस्तू व सेवांचा पुरवठा करण्यासाठी सदर दरपत्रक सूचना या कार्यालयाच्या सूचना फलक व विभागाच्या http://divcomkonkan.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी आपली दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात खालील तक्त्यात नमूद केलेल्या वस्तू व सेवांसाठी कार्यालयाच्या वरील पत्त्यावर दिनांक २४/०३/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मा. उप आयुक्त (विकास-आस्थापना) यांच्या नावे सादर करावीत. सदर दरपत्रके दिनांक २५/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उप आयुक्त (आस्थापना) यांच्या दालनात पुरवठादार/प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाच्या बाबी |
|---|---|
| १ | निवेदक |

**अटी व शर्ती :-**

१. दरपत्रके सादर करताना दर सर्व करांसह असावेत. या व्यतिरिक्त अन्य कोणतीही जादा रक्कम अदा केली जाणार नाही.
२. काम विहीत मुदतीत पार पाडणे बंधनकारक राहील.
३. सर्व साहित्यांची कार्यक्रमाच्या ठिकाणी पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठादारावर राहील.
४. देयकांतून नियमाप्रमाणे कर कपात करण्यात येतील.
५. साहित्य व सेवा पुरवठादारने गुमास्ता प्रमाणपत्र, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड इत्यादींच्या छायांकित प्रत सादर करणे आवश्यक राहील.

कृ.मा.प.

६. कार्यक्रमाच्या स्थळ, वेळ, दिनांक व पुरवठा साहित्य/सेवा यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
७. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा, तसेच प्रस्तावित कामाच्या आराखडयात बदल करण्याचे अधिकार मा. उप आयुक्त (आस्थापना), कोकण विभाग यांचेकडे अबाधित राहतील.

**सोबत** : दरपत्रक नमूना.

Sd/-
**उपआयुक्त (आस्थापना)**
**विकास शाखा, कोकण विभाग**

**प्रत** : १. सामान्य शाखा यांना विभागाच्या सूचना फलकवर प्रसिध्द करण्यासाठी सस्नेह अग्रेषित.
२. सामान्य शाखा यांचे अधिनस्त support@coreocean.in यांना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी सस्नेह अग्रेषित

## YASHWANT PANCHAYAT RAJ ABHIYAN 2023-24

Anchor

| Sr. No. | Description | Rate for whole Event |
|---|---|---|
| 1 | Date will be finalized by Hon. Minister<br>Rural Development Department<br>Time 9.00 AM to End of Event<br>(Approx 4 to 5 hours) | |

**Note** : Sealed quotation should be on Letter Head, in typed along with dully signed & stamp.